http://www.sgbauonline.com/



# B.A. (Part–I) (Semester–II) Examination
## (Optional Subject)
## MARATHI LITERATURE
## (Literature of Modern Language)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

1. संदर्भासह स्पष्टीकरण करा :–

(अ) "साधे शब्द वापरून वापरून इतके गुळगुळीत झालेले असतात; इतके अंगवळणी पडलेले असतात की त्यांचा अर्थ आपल्या लक्षातच रहात नाही. त्यातलाच एक शब्द म्हणजे आई–"

किंवा

"आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर एक वेगळं लेबल मला समाजाने चिकटवलं आणि माझ्याकडून, एका स्त्रीकडून रात्रंदिवस फक्त सेवा करून घेतली."

(ब) "अग, खरेदी करताना भाव करणं हा तर स्त्रीचा खरा स्वभाव आहे. हे जगातल्या सगळ्या दुकानदारांना माहित असतं, म्हणून ते भाव दुप्पट करून सांगतात."

किंवा

"खरंच, लहान मुलांना सांभाळण्यात केवढा आनंद असतो नाही ? आई होण्यात केवढं सुख असतं ह्याची थोडीशी झलक मला आज अनुभवायला मिळाली."

(क) विद्यापीठात शिकायचं स्वप्न,<br>
मी सांगूच शकत नव्हते आईला<br>
ती बिचारी रोग चूल पेटवताना<br>
शिव्या घालायची इतभर पोटाला.

किंवा

'यंदा 10 वी, 12 वीचा निकाल<br>
चांगला लावण्यासाठी प्रयत्न करा'<br>
मी 'लावण्यासाठी' धरून ठेवलं<br>
बाकीचं सारं सोडून दिलं.

(ड) कसा झाला हा मानूसं कवू निंबाचा रे पाला<br>
येल काककीचा होता बारं कारल्याचा आला.

किंवा

धुमसतात अजुनी विझल्या<br>
चितांचे निखारे !<br>
अजुन रक्त मागत उठती<br>
वधस्तंभ सारे !<br>
आसवेच स्वातंत्र्याची अम्हाला मिळाली ! 16



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

2. 'आई' हे व्यक्तिचित्रण नाटकातील मध्यवर्ती केंद्र ठरते, ते कसे ? सविस्तर स्पष्ट करा.

किंवा

'आई रिटायर होतेय' नाटकाचे वाङ्मयीन मूल्यमापन करा. 16

3. (अ) 'आई रिटायर होतेय' या नाटकाने आई विषयी विचार करण्यास कसे भाग पाडले आहे ते लिहा.

किंवा

'आई म्हणजे घराचा आत्मा असतो' ते नाटकाच्या आधारे पटवून द्या. 8

(ब) आईने रिटायर होण्याचा निर्णय घेतला तर कुटुंबाची काय अवस्था होऊ शकते ते नाटकाच्या आधारे लिहा.

किंवा

वीणाचे स्वभावचित्रण रेखाटा. 8

4. (अ) दर पाच वर्षांत सामान्य जनतेचा भ्रमनिरास कशा प्रकारे होत असतो ? 'मेंढरं' या कवितेच्या आधारे विशद करा.

किंवा

'मोडलो मी नाही' या कवितेत यशवंत मनोहरांनी संकटाचा सामना करत पुढे चालत राहण्याची प्रेरणा कशी दिली आहे ? 8

(ब) 'गोंगलू' या कवितेत आधुनिक शहरी जग व आदिवासी जग यातील परस्पर विरोधी दर्शन कसे घडविले आहे ?

किंवा

खालीलपैकी एका कवितेचे रसग्रहण करा :—

(1) चूल

(2) उषःकाल होता होता

(3) साहेबराव पाटील. 8

5. खालील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नातील अचूक उत्तर निवडा :—

(1) "मी मोलकरीन गाठविलेली आहे, सावित्री कुठे दिसत नाही ?" हे वाक्य :

(अ) पपा (ब) वीणा

(क) मंदार (ड) नेत्रा

(2) "रक्ताचं पाणी, हाडाचं काडं, आयुष्याचा होम वगैरे प्रत्येक आई आपल्या मुलांसाठी करत असते .....तुम्ही काय मोठ्ठं नवल केलंत ?" हे वाक्य :

(अ) नेत्राचे (ब) वीणाचे

(क) पपाचे (ड) बेबीचे

(3) "आणि गरज संपते तेव्हा माणसं रिटायर होतात ! रिटायर व्हा आता रिटायर !" हे वाक्य :

(अ) वीणा (ब) मंदार

(क) नेत्रा (ड) पपा

(4) नाटकातील आईचे नाव :

(अ) राधा (ब) सुधा

(क) मुग्धा (ड) श्रद्धा



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(5) 'जाऊ हे, बदलला थोडावेळ शिवाजीचा ______ म्हणून काही बिघडत नाही.

(अ) शिक्षक (ब) मार्गदर्शक

(क) मास्तर (ड) गुरु

(6) नाटकात मॅनेजरच्या पोष्टवर कोण आहे ?

(अ) मंदार (ब) नंदन

(क) पपा (ड) मुकुंद

(7) 'आश्रमाचे नाव

(अ) गंगूताई वृद्ध महिलाश्रम (ब) महिला आश्रय

(क) स्त्री आधार केंद्र (ड) वृद्धाश्रम

(8) 'आई रिटायर होतेय' नाटकाचे लेखक :

(अ) संदिप पाटोळे (ब) अशोक पाटोळे

(क) विजय पाटोळे (ड) किशोर पाटोळे

(9) सर्वंनीच आपआपल्यासाठी उभारलेली एक प्रयोगशाळा म्हणजे :

(अ) ग्रामवासी (ब) झोपडपट्टीवासी

(क) आदिवासी (ड) शहरवासी

(10) गोंगलूच्या मते सर्व देशालाच काय झाले आहे ?

(अ) गजकर्ण (ब) पोलिओ

(क) कॅन्सर (ड) लकवा

(11) कवी महानोर यांचे नाव :

(अ) नामदेव (ब) सुखदेव

(क) रामदेव (ड) कृष्णदेव

(12) कुणाच्या दु:खाचे सोबती होण्याची जाणीव महानोरानी व्यक्त केली आहे ?

(अ) सनाथांच्या (ब) दु:खीतांच्या

(क) अनाथांच्या (ड) दिनदुबळ्यांच्या

(13) सामान्य जनतेला कवीने काय म्हटले आहे ?

(अ) गुरं (ब) मेंढरं

(क) ढोरं (ड) जनावर

(14) "भारत हा कृषिप्रधान देश आहे" हा निबंध साहेबराव पाटलाने कोणत्या वर्गात शिकताना लिहीला :

(अ) चौथ्या (ब) पाचव्या

(क) सातव्या (ड) सहाव्या

(15) "एवढे दे पांडुरंगा" चे कवी :

(अ) महानोर (ब) विठ्ठल वाघ

(क) सुरेश भट (ड) यशवंत मनोहर

(16) सुरेश भट यांच्या मते रात्र कशाची आहे ?

(अ) वैऱ्याची (ब) पुनवेची

(क) चांदव्याची (ड) अमावशेची 16



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/